## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, मुंबई.

**विषय : इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक १७.१०.२०१२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचा इतिवृत्तांत**

दिनांक १७.१०.२०१२ रोजी सकाळी ११.३० वाजता मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची बैठक पार पडली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मधुकर गायकवाड | - | मा.कामगार आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा अध्यक्ष |
| २. | श्री. एस. व्ही. पोटरे, कार्यासन अधिकारी, मंत्रालय, मुंबई. | - | शासन प्रतिनिधी |
| ३. | श्री.एस.बोरसे, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वांद्रे, मुंबई. | - | शासन प्रतिनिधी |
| ४. | श्री. केदार काळे | - | मालक प्रतिनिधी |
| ५. | श्री. प्रकाश देवतळे | - | मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री. मुनवर शेख | | कामगार प्रतिनिधी |
| ७. | श्री. राजेश फुले | | कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्री. दादाराव डोंगरे | | कामगार प्रतिनिधी |
| ९. | श्रीमती राधिका गायकवाड | | कामगार प्रतिनिधी |
| १०. | श्री. एस.एम.कदम | - | कामगार उप आयुक्त (प्र.), मुंबई |
| ११. | श्री. आर.एम.भिसले | - | सरकारी कामगार अधिकारी, मुंबई |

सर्वप्रथम मा.अध्यक्षांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**विषय क्र.१ : मागील बैठकीच्या इतिवृत्तास मंजुरी देणे.**

सुरुवातीस मागील दि. २२.८.२०१२ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तांतास मंजूरी देण्याकरिता वाचन करण्यात आले.

सदर इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ७ मध्ये पुढीलप्रमाणे दोन दुरुस्त्या करण्यात येऊन इतिवृत्तांत सर्व संमतीने मान्य करण्यात आले.

विषय क्र. १० मध्ये अ.क्र. १ मध्ये **"साहित्य खरेदीसाठी कर्ज"** ऐवजी **"साहित्य खरेदीसाठी सहाय्य"** व त्यामधील दुसऱ्या ओळीतील **रु. १ लाख** ऐवजी **रु. ५,०००/-** अशी दुरुस्ती इतिवृत्तांतात बदल करण्याची मागणी श्री. डोंगरे यांनी केली. ती योग्य व टंकलेखनीय

चूक असल्याने त्याप्रमाणे सर्वानुमते ती मान्य करुन त्याप्रमाणे इतिवृत्तांतात बदल करण्यात आला.

विषय क्र. ३ मधील ओळ क्र. ९ येथे **"बैठकीच्या दिवशी रु. १,५००/- भत्ता"** या शब्दाच्या ऐवजी **"बैठकीच्या एक दिवस अगोदर आणि बैठकीच्या दिवशी"** अशी दुरुस्ती करण्याचे श्री. फुले यांनी बदल सुचविले. त्याप्रमाणे इतिवृत्तांतात बदल करण्यात आला.

**याप्रमाणे मागील दि. २२.०८.२०१२ रोजीच्या इतिवृत्तांस एकमताने मान्यता देण्यात आली.**

१. **बांधकाम कामगारांसाठीच्या घरकुल योजनेस मंजुरी देणे.**

मा.अध्यक्षांनी असे प्रतिपादन केले की. घरांची व्यापकता जर लक्षात घेतली तर नोंदीत बांधकाम कामगारांकरिता घरे बांधण्यासाठी आर्थिक सहाय्य देता येईल. तसेच ज्या ठिकाणी घरकुल बांधण्यासाठी स्वस्तात जमीन उपलब्ध होईल, अशा ठिकाणी घरकुल योजना यशस्वीरित्या राबविता येईल. त्यावर श्री. देवतळे यांनी असे सुचविले की, लाभार्थी कामगारांस आर्थिक सहाय्य रु. २ लाख पर्यंत देण्यात यावे. तसेच त्यासाठी काही निकष ठरविणे आवश्यक आहे. त्या आधारे श्री.काळे यांनी सांगितले की, दि. २२.८.२०१२ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.३ मधील घरकुल योजनेच्या अंमलबजावणी संदर्भातील आर्थिक सहाय्याबाबत नमूद केले आहे की, ग्रामीण विभाग रु. १ लाख, नगरपरिषद रु.१.५० लाख, महानगरपालिका क्षेत्रातील रु. २ लाख इ. मध्ये बदल करुन सरसकट सर्वांना रु. २ लाख देण्यात यावेत. त्यावर सर्वानुमते सहमती दर्शवून दि. २२.८.२०१२ रोजीच्या बैठकीतील इतिवृत्तांतास सर्वांच्या वतीने बांधकाम कामगारांसाठी रु. २ लाख देण्याचे ठरले. यावर श्री. केदार काळे यांनी सांगितले की, मुंबईच्या तुलनेत पनवेल, पालघर, डहाणू व विरार या ठिकाणी पाचपट कमी किंमतीत जागा उपलब्ध होवू शकेल. त्यासाठी पायलट प्रोजेक्ट करुन बघायला हरकत नसल्याचे सुचविले. तसेच बांधकाम कामगारांसाठी घर बांधून द्यायचे की त्यांना अर्थसहाय्य द्यायचे यावर विचार करणे सोईचे होईल. श्री. देवतळे यांनी सांगितले की, हाऊसिंग सोसायटीचे जे नियम आहेत, ते नियमही सध्याच्या परिस्थितीमध्ये किचकट आहेत. त्यावर श्री. काळे यांनी सांगितले की. जी योजना तयार करणार आहोत, ती इतकी ठोस असावी की, कोणासही त्यामध्ये दोष काढता येणार नाहीत. तसेच घर बांधून देण्यापेक्षा सदर योजनेचे निकष कायम ठेऊन वैयक्तिकरित्या अर्थसहाय्य देण्यापेक्षा एकत्रितरित्या बांधकाम करण्यासाठी अर्थसहाय्य दिल्यास सोईचे होईल, म्हणजे १० लोकांनी मिळून गृहनिर्माण सहकारी संस्था स्थापन करुन गृहनिर्माण सहकारी संस्था

बांधली तर बांधकामाचा खर्च कमी होईल. यावर मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, नोंदीत बांधकाम कामगाराकडे जागेची हमी असेल तरच अर्थसहाय्य देण्यात येईल. तसेच बांधकामासाठी अर्थसहाय्य देण्याकरिता प्रत्येकी रु. २ लाख द्यावेत.

**ठराव :** नोंदीत इमारत व इतर बांधकाम कामगाराला घरकुल योजने अंतर्गत घर बांधण्यासाठी प्रत्येकी रु. २ लाख सरसकट अर्थसहाय्य म्हणून देणे तसेच समुह पध्दतीने घरकूल बांधण्याकरिता कामगाराने मागणी केल्यास मंडळापुढे प्रकरण ठेवून त्यावर विचार करुन मंडळ त्यास मान्यता देईल.

**सूचक** :- श्री. केदार काळे.

**अनुमोदक** :- श्री. दादाराव डोंगरे.

सदर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

**विषय क्र. २ : आयत्यावेळचे विषय-**

१) **बांधकाम कामगारांची व पाल्यांची कौशल्य व कौशल्यवृध्दी कौशल्य व कौशल्यवृध्दीसाठी बांधकाम कामगार व त्याची पत्नी किंवा पती व सर्व मुलांचा समावेश करण्यात येत आहे.**

**ठराव :** ठराव करण्यात आला की, इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या व त्यांच्या पाल्यांच्या कार्य कौशल्य व कौशल्यवृध्दीसाठी घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षणास नोंदणीकृत बांधकाम कामगार, त्याच्यावर अवलंबून असलेली त्याची पत्नी/पती व त्याची दोन पाल्ये यांचाही समावेश करण्यात यावा व फक्त दोन पाल्यांपर्यंत सदरचा लाभ देण्यात यावा.

**सूचक** :- श्री. राजेश फुले.

**अनुमोदक** :- श्री. केदार काळे.

सदर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

२. **मंडळ सदस्यांच्या व कर्मचा-यांच्या दिल्ली येथे आयोजित केलेल्या अभ्यास दौऱ्यासाठी रु. २ लाख मंजूर करणे.**

मा.अध्यक्षांनी मंडळाच्या सदस्यांचा दिल्ली येथे दौरा आयोजित करण्याबाबत दिल्ली कामगार आयुक्त यांचेशी चर्चा झाली. तथापि, त्यांचेकडून निश्चित स्वरुपाचे न कळल्याने दौरा निश्चित करता आला नाही. सबब, मंडळ सदस्यांनी इतर राज्यातील इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांच्या कामाची पाहणी करण्यासंदर्भात दौरा आयोजित करण्याचे अधिकार मा. अध्यक्षांना दिले. तसेच दिल्ली, तामिळनाडू, केरळ व मध्य प्रदेश या राज्यांबरोबर

पत्रव्यवहार करावा, जेणेकरुन त्याप्रमाणे दौरा निश्चित करता येईल असेही सुचविले.. त्याप्रमाणे पत्रव्यवहार करुन निश्चित झाल्यास दिवाळीनंतर दौरा आयोजित करता येईल, असे मा. अध्यक्षांनी स्पष्ट केले.

**३. शासनाद्वारे कार्यान्वित असलेल्या म.न.रे.गा. योजनेंतर्गत ९० दिवस काम केलेल्या बांधकाम कामगारांना नोंदीत करुन योजनांचा लाभ त्यांना देणे. त्याचप्रमाणे मध्यप्रदेश शासनाच्या धर्तीवर कामगारांचे प्रतिज्ञापत्र घेवून नोंदणी करणे व याबाबत नियमात दुरुस्तीबाबतचा प्रस्ताव पाठविणे.**

मा. अध्यक्षांनी हैद्राबाद येथे इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांच्या बैठकीच्यावेळी मध्य प्रदेश सरकारने त्यांच्या राज्यात कार्यान्वित असलेल्या म.न.रे.गा. योजनेअंतर्गत १२ महिन्यांत ९० दिवस काम केलेल्या इमारत व इतर बांधकाम कामगारांना नोंदीत करण्यात येऊन त्यांना मंडळाचे लाभ दिले जात असल्याचे सांगून त्याप्रमाणे महाराष्ट्रातही म.न.रे.गा.अंतर्गत कार्यरत असलेल्या बांधकाम कामगारांना याचे मंडळाकडे नोंदीत करुन त्यांना मंडळांतर्गत विविध कल्याणकारी योजनेचे लाभ द्यावे, असे मंडळापुढे नमूद केले. सर्व सदस्यांनी यास सहमती दर्शवून ते स्थानिक आहेत, त्यामुळे त्यांना त्याचा फायदा होईल, असेही प्रतिपादन केले.

**ठराव :** शासनाद्वारे कार्यान्वित असलेल्या म.न.रे.गा. योजनेअंतर्गत १२ महिन्यांत ९० दिवस काम केलेल्या इमारत व इतर बांधकाम कामगारांना नोंदीत करुन त्यांना योजनेचा लाभ देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविण्याचे एकमताने मान्य करण्यात आले.

**सूचक** :- श्री. राजेश फुले.

**अनुमोदक** :- श्री. केदार काळे.

सदर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

४. **एस.टी. महामंडळास मंडळाची जाहिरात देणे.**

श्री. फुले यांनी असे सांगितले की, एस.टी. किंवा दूरदर्शनवरुन जर जाहिरात प्रसिद्ध केली तर ती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल. यासंदर्भातील शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.मावज-२०१२/प्र.क्र.२९१/३४, दि. १५.०९.२०१२ च्या दराप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी असे सुचविले. त्यावर मा. अध्यक्षांनी पुढील बैठकीत सदर जाहिरातीचा नमुना ठेवण्यात येईल, असे सांगितले. तसेच दरपत्रकांबाबत अभ्यास करावा लागेल. त्यामुळे सदरचा विषय पुढील बैठकीमध्ये ठेवण्यात यावा असे एकमताने ठरले.

५. **मंडळात जमा असलेल्या उपकराच्या रकमेच्या गुंतवणूकीबाबत/मंडळाचा जमा खर्च.**

मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, मंडळात मोठ्या प्रमाणात उपकराची रक्कम जमा होत असल्याने त्या रकमेचे योग्यरितीने गुंतवणूक करण्याकरीता अभ्यासगट असावा त्यासाठी एक उप समिती गठीत करावी, ज्यामध्ये मा.कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, अध्यक्ष असतील व एक मालक प्रतिनिधी व एक कामगार प्रतिनिधी यांचा समावेश असावा. त्या अनुषंगाने सदर अभ्यासगट समितीवर श्री. प्रकाश देवतळे, मालक प्रतिनिधी व श्री. राजेश फुले, कामगार प्रतिनिधी यांची निवड सर्वानुमते करण्यात आली.

त्यावर श्री. प्रकाश देवतळे यांनी असे सांगितले की, मंडळाच्या जमाखर्चाचे लेखा परिक्षण करण्याकरीता खाजगी लेखा परिक्षकांची नेमणूक केलेली आहे व सदर लेखा परिक्षकांना वार्षिक रु. २.५० लाख इतके मानधन दिले जाते. सदर लेखा परिक्षकांकडूनच मंडळाचे हिशोब लिहिण्याचे काम करुन घेता येईल किंवा कसे ? तसेच मंडळाच्या संगणकावर टॅली संगणक प्रणाली टाकून घेतल्यास कार्यालयातील कर्मचारीही सदर हिशोब ठेवण्याचे कामकाज करु शकतील.

**ठराव -** अकाऊंटस सॉफ्टवेअरबाबत ग्लोडाईन ही शासन नियुक्त कंपनी सॉफ्टवेअर करुन देत नसेल तर इतर खाजगी कंपनीकडून सदरचे अकाऊंटस सॉफ्टवेअर करण्यात यावे.

**सूचक** : श्री. प्रकाश देवतळे

**अनुमोदक :** श्री. राजेश फुले

सदर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

मा. अध्यक्षांनी जमा उपकर गुंतवणूकीबाबत असे सांगितले की, राष्ट्रीयीकृत बँकांचे व्याज दर हे बँकनिहाय व गुंतवणूक रक्कमनुसार बदलत असून त्याबाबत प्राप्त बँकाकडील माहिती मंडळापुढे स्पष्ट केली. त्याव्यतिरिक्त इतर राष्ट्रीयीकृत बँकेच्यासंदर्भात जर इतर सदस्यांना अवगत असेल तर त्यांनी त्याबाबतची माहिती द्यावी. त्यावर श्री. प्रकाश देवतळे यांनी सदर बाबतीत दोन दिवसात माहिती घेवून मंडळास सादर करण्यात येईल, असे सांगितले.

६. **बांधकाम कामगारांसाठी मोफत बस प्रवास योजना.**

मा. अध्यक्षांनी सांगितले की, महाराष्ट्रांतर्गत मोफत बस प्रवास योजनेअंतर्गत अभ्यास समिती नेमण्यात येईल व त्यावर मा. कामगार आयुक्त अध्यक्ष असतील. तसेच इतर सदस्य,

कामगार प्रतिनिधी, श्री. मुन्वर शेख व मालक प्रतिनिधी, श्री. केदार काळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

ठराव : एस.टी.मधून नोंदीत बांधकाम कामगार त्याच्या घरी त्याची पत्नी व १८ वर्षाखालील दोन मुले यांना वर्षातून एकदा १००० कि.मी पर्यंतचा प्रवास मोफत करण्यास मान्यता देण्यात आली.

**सूचक** :- श्री. प्रकाश देवतळे

**अनुमोदक** :- श्री. दादाराव डोंगरे

सदर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

**७. मंडळातील नोंदणी इत्यादीचे संगणकीकरण.**

श्री. प्रकाश देवतळे यांनी सांगितले की, संगणकावर स्वस्त, कायदेशीर आणि चुका नसलेल्या नोंदी होणे आवश्यक आहे. त्यावर मा.अध्यक्षांनी सांगितले की, संगणकीकरण करण्याकरिता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) यांच्याकडून डेटा एन्ट्रीचे कामकाज करुन घेणे जास्त सोयीचे व खर्चाच्या दृष्टीने परवडण्यासारखे आहे व त्याबाबत संचालक, व्यवसाय व प्रशिक्षण संस्था यांच्याशी चर्चा झाली असून त्यांना रु. १/- दराने नोंदणीसाठी देण्यास तयार असल्याचे सांगितले.

ठराव : प्रत्येक नोंदीसाठी रु. १/- याप्रमाणे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) यांना डेटा एन्ट्रीचे काम देण्यात यावे. तसेच सदर नोंदी अचूक आहेत किंवा कसे हे तपासण्यासाठी कामगार विभागाचे अधिकारी पर्यवेक्षण करतील.

**सूचक** :- श्री. प्रकाश देवतळे

**अनुमोदक** :- श्री. दादाराव डोंगरे

सदर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

**८. नोंदणी करण्यासाठीचे प्रमाणपत्र महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार नियम, २००७ मधील नियम ३३(३)(ग) मध्ये दुरुस्ती करण्याबाबत.**

श्री. डोंगरे यांनी नाका कामगारांना मंडळाचे नोंदणीकृत कामगार झाल्याबाबत दि. ९.२.२०१२ रोजी ठराव करण्यात आला असून त्याप्रमाणे दुरुस्ती करण्याबाबत शासनास दि. १६.४.२०१२ रोजी प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यामध्ये त्यांनी उक्त नियम ३३(३)(ग) मध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती सुचविली.

ठराव - नोंदणीसाठी बांधकाम कामगारांना ९० दिवसांचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार बांधकाम कामगार क्षेत्रातील अनुभव कामगार संघटनांना राहील व ज्यांचे उद्दिष्ट बांधकाम कामगार कल्याणाचे आहे त्याप्रमाणे उक्त ३३(३)(ग) मध्ये-

"नियोक्त्याचे प्रमाणपत्र किंवा बांधकाम कामगार क्षेत्रातील अनुभवी कामगार संघटना, ज्यांचे उद्दिष्ट बांधकाम कामगार कल्याणाचे आहे, त्यांचे प्रमाणपत्र" अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**सूचक** :- श्री. डोंगरे

**अनुमोदक** :- श्री. देवतळे

सदर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

९. **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळावर प्रशासन / कार्मिक अधिकारी व लेखा अधीक्षक ही दोन पदे कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत.**

श्री. काळे यांनी सांगितले की, शासनाने मंजूर केलेली कार्मिक अधिकारी व लेखा अधीक्षक ही दोन पदे भरण्याचे अधिकार मा.अध्यक्षांना आहेत. त्याप्रमाणे ते लवकरात लवकर भरण्यास सर्व सदस्यांनी मान्यता दिली.

ठराव : शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. इमारत २०१२/ प्र.क्र.८६/ कामगार ७-अ, दिनांक १.१०.२०१२ अन्वये मंडळावर प्रशासकीय/कार्मिक अधिकारी व लेखा अधीक्षक ही दोन पदे सद्य:स्थितीत कामगार उप आयुक्त किंवा तत्सम पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या व लेखाविषयक अनुभव असलेल्या अधिका-यांमधून आणि वर्तमानपत्रातून जाहिरात देवून तात्पुरत्या स्वरफपात पुढील सहा महिन्याकरिता उक्त शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे सदरची दोन पदे भरण्यास मान्यता देण्यात आली व सदरची दोन पदे भरण्याचे अधिकार मा.अध्यक्षांना आहेत.

**सूचक** :- श्री. फुले

**अनुमोदक** :- श्री. काळे

सदर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

१०. **आस्थापना समिती नेमण्याबाबत.**

शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. इमारत-२०१२/प्र.क्र.१६१/कामगार-७ब, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१२ अन्वये महारष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार

कल्याणकारी मंडळामध्ये कर्मचारी यांच्या भरतीस मान्यता दिल्याबाबतची माहिती मंडळास देण्यात आली व शासन निर्णयाच्या प्रती सर्व सदस्यांना देण्यात आल्या. मा. अध्यक्षांनी सांगितले की, मंडळामध्ये शासनाने मान्यता दिलेल्या ५६ पदे भरतीसाठी आस्थापना समिती नेमण्यात येईल.

**ठराव :** आस्थापना समिती नेमून सदर समितीवर श्री. फुले, श्री. काळे आणि श्रीमती गायकवाड यांची निवड करण्याचा ठराव करण्यात आला.

**सूचक** :- श्रीमती गायकवाड

**अनुमोदक** :- श्री. देवतळे

सदर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

११. **प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत.**

मा. अध्यक्षांनी सांगितले की, महाराष्ट्रातील नोंदीत बांधकाम कामगारांकडून आलेल्या लाभार्थी अर्जांपैकी १७ अर्ज लाभ देण्यास पात्र ठरले आहेत. त्यावर सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला. त्यांना धनादेश अदा करण्यास मान्यता देण्यात आली.

**ठराव -** मंडळाने विविध कल्याणकारी योजनेअंतर्गत केलेल्या नियमाला अधीन राहून उक्त १७ अर्जांना मंजुरी देण्यात येत आहे.

**सूचक** :- श्री. डोंगरे

**अनुमोदक** :- श्रीमती गायकवाड

सदर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

१२. **वर्तमानपत्रात जाहिरात देण्याबाबत.**

मा. अध्यक्षांनी सांगितले की, माहिती व जनसंपर्क खात्यांतर्गत असलेल्या सर्व ए-ग्रेड वर्तमानपत्रांमध्ये मंडळाची जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी, असे एकमताने ठरले.

ठराव- एस.टी.महामंडळातर्फे जाहिरात देण्याचे दर निश्चित होईपर्यंत ठराव एकमताने मंजूर

**सूचक** :- श्री. काळे

**अनुमोदक** :- श्री. देवतळे

सदर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

१३. **शिलाई मशीन पुरविण्याबाबत.**

मा. अध्यक्षांनी सांगितले की, शिलाई मशीनचे प्रशिक्षण पूर्ण झालेल्या महिला कामगारांनाच शिलाई मशीन देण्यात येईल.

<u>ठराव</u> - बांधकाम कामगार व पाल्यांची कार्य कौशल्य व कौशल्यवृध्दी प्रशिक्षणांतर्गत शिलाई मशीनचे प्रशिक्षण पूर्ण झालेल्या व परीक्षा उत्तीर्ण होवून प्रमाणपत्र मिळालेल्या महिलांना (नोंदीत बांधकाम कामगार) शिलाई मशीन देण्यास मान्यता देण्यात आली.

**सूचक** :- श्री. डोंगरे

**अनुमोदक** :- श्रीमती गायकवाड

सदर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

<u>१४</u>. **इमारत व इतर बांधकाम कामगारांचे नोदणी व मंडळाच्या विकास कल्याण योजनासाठी लाभार्थीची निवड करण्याच्या कामासाठी एम.एल.एस.विद्यार्थ्याचे सहाय्य घेणे.**

श्री. फुले यांनी कामगारांची नोंदणी तसेच लाभार्थ्याची निवड करण्यासाठी लेबर मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई व नागपूर येथील एम.एल.एस.करणा-या विद्यार्थ्याचे सहाय्य घेण्याची सूचना केली. त्याबाबत खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

<u>ठराव-</u> लेबर मॅनेजमेट स्टडीज, मुंबई व नागपूर येथील एम.एल.एस.चे शिक्षण घेणा-या विद्यार्थ्याचे मंडळाकडील कामगारांची नोदणी तसेच त्यामधील लाभार्थीची निवड करण्याकरिता सहाय्य घेणा-या सूचनेचा ठराव करण्यात आला.

**सूचक** :- श्री. फुले

**अनुमोदक** :- श्री. देवतळे

सदर ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

बैठकीच्या शेवटी श्री.डोंगरे यांनी आपण सदर बैठकीसाठी २२ मागण्यांचे निवेदन देवून त्याचा समावेश बैठकीच्या नियमात करण्यात यावा असे कळवूनही त्याची दखल घेतली नाही असे सांगितले. तथापि, मा.अध्यक्षांनी त्याबाबतचे वाचन करुन या बैठकीत झालेली कार्यवाही वगळता आवश्यक असल्यास इतर विषयाबाबत पुढील बैठकीत चर्चा करता येईल हे स्पष्ट केले.

**कामगार आयुक्त तथा अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याण मंडळ,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

BOC Min.२२.८(asa)

साबत- लाभार्थींची यादी